# ARTS & COMMERCE COLLEGE, VADUJ.

Student Name - Jadhav Komal Ananda

Roll No. - 372

Class - B.Com III

Subject Teacher - Khot. C. M.

Teachers Name - Co-Opeeation

Year = 2016-17

Scanned with CamScanner

Date : / /
Page No.: 1

प्र. 1 महाराष्ट्रातील कापूस सहकारी संस्थांचे कार्य आणि महत्त्व सांगून त्यांची समस्या व त्यावरील उपाययोजना स्पष्ट करा.

→ प्रस्ताविक :-

मानवाच्या मूलभूत गरजा म्हणजे अन्न, वस्त्र आणि निवारा या होत. यातील ~~कापूस~~ वस्त्र ही गरज भागविण्यासाठी मानव समाज प्राचीन काळापासून कापूस या पिकावर मोठ्या प्रमाणात अवलंबून राहिला आहे. आजच्या काळात कापूस हे एक प्रमुख व्यापारी पीक बनले आहे.

कापसावर प्रक्रिया करून त्यास वापरायोग्य बनविण्यासाठी कार्य करणाऱ्या सहकारी क्षेत्रातील खाली प्रक्रिया संस्थांचा विचार केला जातो.

(अ) कापूस पिंजणी व गठ्ठेबांधणी सहकारी संस्था.

(ब) सहकारी सूतगिरण्या.

(ब) ~~सहकारी स~~ कापूस सहकारी संस्थांचे कार्य आणि महत्त्व :-

ग्रामीण भागाच्या तसेच शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासासाठी कापूस सहकारी संस्थांनी केलेले कार्य व त्याचे महत्त्व ~~आ~~ खालीलप्रमाणे आहे :-

(i) मालाचे एकत्रीकरण व प्रक्रिया :-

कापूस सहकारी संस्था सभासद शेतकऱ्यांकडून उत्पादित मालाच्या एकत्रीकरणाचे तसेच त्यासाठी आवश्यक मालाची वर्गवारी, प्रतवारी, बांधणी व वाहतूक करणे इ. कार्ये करतात. गोळा करण्यात आलेल्या मालावर प्रक्रिया करण्याचे महत्त्वाचे कार्य कापूस सहकारी संस्था करतात.

(२) मध्यस्थ व सावकारांचे उच्चाटन :-

महाराष्ट्रातील कापूस खरेदी एकाधिकारशाही योजना सन २००२ मध्ये संपुष्टात आली. या काळात कापूस शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणींमुळे त्यांनी ~~माल~~ माल मध्यस्थ व व्यापाऱ्यांना कमी किमतीत विकला. सदर मालाची बाजारपेठेत विक्री करताना पुरवठ्यात होणाऱ्या वाढीने कापसाच्या किमती घसरू लागल्या. व शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होऊ लागले. आर्थिक अडचणींमुळे कापूस उत्पादक शेतकरी सावकारी पाशात रुतू लागला. यावर उपाय म्हणजे शेतकऱ्यांनी

Scanned with CamScanner

त्यांचा माल त्यांच्या स्वतःच्या सहकारी कापूस संस्थांना विकणे हा होय. अशा प्रकारच्या विक्रीने शेतकऱ्याला त्याच्या मालास योग्य किंमत मिळेल.

(3) शेतमालाला योग्य भाव :-

सहकारी कापूस संस्थांना केलेल्या कापूस विक्रीमुळे कापसाच्या खरेदी - विक्री खर्चात कपात होते, तसेच प्रक्रिया केलेल्या कापसाला अधिकाधिक भाव मिळावा यासाठी सदर सहकारी संस्था प्रयत्न करीत असल्याने त्याचा अप्रत्यक्ष फायदा शेतकऱ्याला होतो.

(4) उत्पादन वाढीस प्रोत्साहन :-

महाराष्ट्रातील कापूस संस्थांना केलेल्या कापूस विक्रीमुळे शेतकऱ्यांना ~~उत्पादन~~ वाढीव उत्पादनासाठी प्रेरणा मिळते. महाराष्ट्रातील कापूस सहकारी संस्था त्या उत्पादन वाढीसाठी शेतकऱ्याला उत्तम प्रतीच्या बियाणांचा पुरवठा करणे, शेतीमधील तंत्रज्ञान वापरविषयक मार्गदर्शन करणे, कापूस काढणी, साठवणूक याविषयी मार्गदर्शन करणे इ. कार्य कापूस सहकारी संस्था करतात.

(5) माहिती संकलन :-

कापसाखालील एकूण क्षेत्र, कापसाचे उत्पादन, कापूस मागणी व पुरवठ्याचा अंदाज तसेच सहकारी संस्थांतील कापूस पिंजणं, गठ्ठे-बांधणी व सूतगुंडीनिर्मिती या संबंधाने व सहकारी संस्थांच्या नफाक्षमतेसंबंधी महत्त्वपूर्ण माहिती एकत्रित करण्यासाठी कापूस सहकारी संस्थांची मदत होते.

(6) कर्जवसुलीस मदत :-

कापूस सहकारी संस्था, कृषी पतपुरवठा संस्थांशी संबंधीत असल्यास अशा पतपुरवठा संस्थांनी शेतकऱ्यांना दिलेल्या कर्जवसुलीसाठी कापूस सहकारी संस्थांची मदत होते.

(7) शेती व ~~शेतकरी~~ शेतकरीवर्गाचा आर्थिक विकास :-

कापूस सहकारी संस्थांमुळे शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळण्यास मदत होते. कापूस प्रक्रियेतून शिल्लक राहणाऱ्या सरकीवरील प्रक्रियेतून अतिरिक्त उत्पन्न मिळाल्याने एकूण उत्पादन खर्च कमी होण्यात व उत्पन्न वाढण्यास मदत होते. सावकार तसेच मध्यस्थांच्या कचाट्यातून शेतकऱ्यांची मुक्तता करण्यास

Scanned with CamScanner

हीसुद्धा सदर सहकारी संस्थांचे कार्य उपयुक्त ठरते.

(क) कापूस सहकारी संस्थांपुढील समस्या :-

कापूस सहकारी संस्थांपुढे पुढील महत्त्वाच्या समस्या आहेत.

(१) अकार्यक्षम व बंद पडणाऱ्या संस्थांची वाढती संख्या :-

कापूस सहकारी संस्थांच्या उपलब्ध आकडेवारीकडे बघता बंद पडणाऱ्या व कार्यरत नसणाऱ्या सहकारी संस्थांची संख्या वेगाने वाढत चालली आहे. सदर आकडेवारी पाहता एकूणच सहकारी कापूस संस्थांच्या अस्तित्वासमोरच मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झालेले दिसून येते.

(२) कालबाह्य यंत्रसामग्री व पायाभूत सुविधांसंबंधी विषयक समस्या :-

कापूस सहकारी संस्थांच्या बाबतीत विशेषतः सूतगिरण्यांच्या बाबतीत सध्या आढळणारी महत्त्वाची समस्या म्हणजे कालबाह्य यंत्रसामग्रीचा होणारा वापर ही आहे.

(३) खाजगी क्षेत्राकडून स्पर्धा :-

कापूस सहकारी संस्थांपुढे सध्या खाजगी क्षेत्रातील संस्थांनी मोठे आव्हान उभे केले आहे. एका बाजूला बंद पडणाऱ्या व अकार्यक्षम कापूस सहकारी संस्थांची संख्या वाढत असतानाच दुसऱ्या बाजूला व्यावसायिक तत्त्वावर चालणाऱ्या खाजगी कापूस प्रक्रिया संस्थांची संख्या वेगाने वाढत चालली आहे.

(४) भांडवलविषयक समस्या :-

अनेक क्षेत्रांतील सहकारी संस्था त्यामुळे आर्थिकदृष्ट्या सक्षम नाहीत. आज चालू असणाऱ्या कापूस सहकारी संस्थांकडे पुरेसे भांडवल उपलब्ध नाही. विशेषतः खेळत्या भांडवलाच्या उपलब्धतेच्या बाबतीत ही समस्या तीव्र आहे.

(५) कच्च्या मालाच्या पुरवठाविषयक समस्या :-

खाजगी क्षेत्रातील संस्थांकडून वाढलेली स्पर्धा, दुष्काळ, गारपीट यासारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे वाया जाणारे कापसाचे पीक, कापसाला हमीभाव मिळण्यासाठी होणारी आंदोलने याचा परिणाम म्हणून कापूस सहकारी संस्थांना कच्च्या प्रक्रियेसाठी कच्चा माल उपलब्धतेविषयी समस्यांचा ~~सम~~ सामना करावा लागतो आहे

Scanned with CamScanner

Page No..

(६) दोषास्पद किंमत धोरण :-
कापूस सहकारी संस्थांचे किंमत धोरण दोषास्पद आहे. कापूस अथवा उत्पादित मालाच्या किमतीत होणाऱ्या चढउतारांमुळे तौलनिक आढावा न घेतल्याने त्याचा सदर संस्थांच्या अस्तित्वावर प्रतिकूल परिणाम होतो आहे.

(ड) कापूस सहकारी संस्थांच्या समस्येवरील उपाययोजना :-
कापूस सहकारी संस्थांबाबतीत आढळणाऱ्या वर चर्चा केलेल्या समस्यांच्या अनुषंगाने सदर क्षेत्रातील संस्थांच्या विकासासाठी खालील उपाययोजना करण्यात येत आहेत :-

(१) यंत्रसामग्री व तंत्रज्ञानाचे आधुनिकीकरण :-
कापूस सहकारी संस्थांची कार्यक्षमता, उत्पादकता व नफाक्षमता वाढविण्यासाठी सदर संस्थांमध्ये वापरात असलेल्या यंत्रसामग्रीचे आधुनिकीकरण करणे तसेच एकूण उत्पादन प्रक्रियेत जास्तीतजास्त प्रमाणात तंत्रज्ञानाचा वापर करणे आवश्यक आहे.

(२) शासकीय मदत :-
कापूस सहकारी संस्थांच्या पुनरुज्जीवनासाठी व त्यांच्या आधुनिकीकरणासाठी सदर क्षेत्राला सक्रिय शासकीय मदतीची अपेक्षा आहे व या अनुषंगाने महाराष्ट्र राज्यात कार्य होताना दिसत आहे.

(३) कार्यक्षम नियोजन आणि व्यवस्थापन :-
कापूस सहकारी संस्थांनी आपल्या नित्याच्या व्यवस्थापनात कार्यक्षमता आणणे आवश्यक आहे. यासाठी राजकीय हस्तक्षेपाला टाळून तज्ज्ञ व अनुभवी व्यवस्थापकांची नेमणूक सदर संस्थांमध्ये करणे आवश्यक आहे. याचबरोबर सदर संस्थांनी संस्थेच्या व्यावसायिकतेचे काही निकष निश्चित करणे गरजेचे आहे.

(४) कामगार प्रशिक्षण आणि मार्गदर्शन :-
कापूस सहकारी संस्थांमध्ये कुशल मनुष्यबळाची उपलब्धता होण्यासाठी सदर संस्थांनी एकत्रितपणे कामगार प्रशिक्षण आणि मार्गदर्शन कार्यक्रम राबविणे आवश्यक आहे. याचा फायदा कामगारांचे आधुनिक तंत्रज्ञान व्यापाराविषयक ज्ञान

वाढवयात त्यांच्याद्वारे होणारा मालाचा अपव्यय टाळण्यात व त्यांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी होईल.

(5) कच्च्या मालाचा पुरवठा निश्चित करणे :-

कापूस सहकारी संस्थांनी सहकारी साखर कारखान्यांप्रमाणे आपल्या सभासद शेतकऱ्यांच्या माध्यमातून त्यांना लागणाऱ्या कच्च्या मालाचे नियोजन व त्याचा योग्य वेळी पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी कार्यक्रम निश्चित केला पाहिजे.

(6) उत्पादन विक्री आणि विपणनासाठी प्रयत्न :-

कापूस सहकारी संस्थांनी त्यांनी प्रक्रिया केलेल्या मालाची विक्री केवळ त्यांच्या कार्यक्षेत्रातील कापडनिर्मिती संस्थांना न करता त्यांच्या मालाचे योग्यरित्या विपणन करून त्याला जास्तीत जास्त भाव मिळेल अशा ठिकाणीच आपल्या मालाची विक्री करणे आवश्यक आहे.

(7) कापडनिर्मिती संस्थांसोबत दुवा निर्माण करणे :-

कापूस सहकारी संस्थांनी त्यांनी प्रक्रिया केलेल्या मालाच्या निश्चित उठाव व विक्रीसाठी त्यांची उत्पादने कच्चा माल म्हणून वापरणाऱ्या कापडनिर्मिती संस्थांसोबत दीर्घकालीन संबंध अथवा दुवा निर्माण करणे आवश्यक आहे.

अशाप्रकारे कापूस सहकारी संस्थांपुढील समस्यांवरील उपाययोजना आहेत.

Scanned with CamScanner

प्र. २ सहकारी संस्थांची हिशोबतपासणी म्हणजे काय? ते सांगून त्याची आवश्यकता व महत्त्व स्पष्ट करा.

→ (अ) प्रस्ताविक :-

एखाद्या संस्थेने लिहिलेल्या किंवा तयार केलेल्या हिशोबाची हिशोबलेखांमधील हिशोबाच्या योग्यता आणि सत्यतेबाबतची तपासणी करणे म्हणजे हिशोबतपासणी होय. हिशोब तपासणी ही कार्याशी संबंधीत असते.

(ब) सहकारी संस्था : हिशोब तपासणी - व्याख्या :-

(1) "देशात सहकारी कायद्यानुसार अस्तित्वात आलेल्या आणि नोंदविलेल्या सहकारी संस्थांची हिशोब~~तपासणी~~ ची तपासणी म्हणजे सहकारी संस्था हिशोब तपासणी होय."

(2) प्रा. कृष्णास्वामी यांच्या मताप्रमाणे,
'सहकारी हिशोब तपासणी म्हणजे फक्त हिशोबाच्या पुस्तकांची तपासणी करणे नसून, हिशोबाची अचूकता जाणण्याच्या दृष्टीने संस्थेच्या कामकाजाची चौकशी करणे आणि सहकारी तत्त्वानुसार संस्थेच्या सभासदयांच्या गरजा पूर्ण करून सभासदांचे आर्थिक कल्याण कितपत ~~निघाले~~ साधले जाते याची ~~चे~~ चौकशी करणे होय."

(क) हिशोब तपासणी किंवा अंकेक्षणाची आवश्यकता व महत्त्व :-

सहकारी क्षेत्राच्या दृष्टीतून हिशोब तपासणी किंवा अंकेक्षणाची आवश्यकता व महत्त्व पुढील मुद्दयांच्या आधारे स्पष्ट करता येईल.

(1) दुर्बल व आशिक्षीत व्यक्तींचा सहभाग :-

सहकारी क्षेत्राची निर्मिती ही मुळात समाजातील दुर्बल घटकांच्या सर्वांगिण विकासाच्या हेतूने करण्यात आली. हा घटक आशिक्षीत असल्याने सहकाराची तत्त्वे, व्यवहार व पद्धतीची त्यांना कल्पना नसते. त्याचा गैरफायदा हितसंबंधी लोकांकडून घेतला जाण्याची शक्यता असते. अंकेक्षणामुळे सहकारात निधीचा योग्य वापर होतो की नाही यावर लक्ष ठेवले जाते.

(2) हिशोबात प्रामाणिकपणा :-

सहकारी संस्थेकडील निधीचा वापर प्रामाणिकपणे झाला

जाहिजे आणि त्याबाबतचे योग्य हिशोब लिहिले गेले पाहिजेत. हिशोब तपासणीत संस्थेच्या आर्थिक व्यवहार व त्या संबंधीच्या व्यवहारांची तपासणी होते.

(3) कर्मचाऱ्यांत जबाबदारीची भावना :-
सहकारी संस्थेचा मिळणारा कारभार कर्मचारी वर्गाच्या मदतीने चालविला जातो. संस्थेच्या हिशोबाची तपासणी व अंकेक्षण केले जात असल्याने कर्मचारी वर्ग आपल्या कामात सतर्क राहून कार्य कर्तव्य भावनेने व जबाबदारीने पार पाडतो.

(4) सभासद हिताचे रक्षण :-
अंकेक्षण किंवा हिशोब तपासणीमुळे संस्थाचालक व कर्मचारी वर्ग आपली कर्तव्ये योग्य प्रकारे पार पाडतो. तसेच संस्थेच्या निधीचा योग्य वापर होऊ शकतो. त्यातून सभासदांच्या हिताचे रक्षण होते.

(5) संस्थेच्या कारभारात कार्यक्षमता :-
अंकेक्षणासाठी संस्थेच्या व्यवहाराची कागदोपत्री, योग्य नोंद ठेवणे, कागदपत्रे जतन करणे आणि हिशोब वेळेवर लिहिणे आवश्यक ठरते. त्यामुळे सहकारी संस्था, संचालक मंडळ व कर्मचारी वर्गात प्रामाणिकपणाबरोबर कार्यक्षमता निर्माण होते.

(6) चुका आणि लबाडीचा शोध :-
हिशोब तपासणीमुळे सहकारी संस्थेच्या हिशोबातील चुका, लबाडी अगर अफरातफर यांची कल्पना येत असते. व त्याबाबत जबाबदारीही निश्चित करता येते व जबाबदार व्यक्तींना शिक्षाही करता येते.

(7) कर्ज उभारणीस मदत :-
सहकारी संस्थेची हिशोब तपासणी वेळेवर करून नफा-तोटा पत्रक व ताळेबंद तयार केल्याने संस्थेला जिल्हा सहकारी बँका, नाबार्ड, यांसारख्या संस्थांकडून कर्ज उभारणे शक्य होते.

(8) सभासदांचा विश्वास दृढ होतो :-
अंकेक्षण किंवा हिशोब तपासणीमुळे हिशोबात नियमितपणा येतो. नफा-तोटा पत्रक व ताळेबंदामुळे सभासदांना संस्थेच्या प्रगतीची कल्पना येते व व्यवहाराची दिशा कळते.

Scanned with CamScanner

सभासदांना संचालक मंडळावरील विश्वास दृढ करण्यासाठी हिशेब तपासणी अत्यावश्यक ठरते.

Scanned with CamScanner